नियमित फौ. ख. क्र.१११/२०२४
सरकार -वि.- चंद्रशेखरसिंह
नि.क्र. २८.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.६ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - रावसाहेब भाऊसाहेब कांडलकर,
वय ३० वर्षे, व्यवसाय – दुकान,
राहणार – भिवापूर, ता. भिवापूर, जि. नागपूर.

**सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत**

१. फिर्यादी भारतीसिंह व आरोपी चंद्रशेखरसिंह यांना मी ओळखतो. मी कामथे यांच्या घरी किरायाने राहतो. माझ्या शेजारी भारतीसिंह राहत आहे. दि.१२.०४.२०२४ रोजी मी दुकानावरुन रात्री घरी परत आल्यावर मला फिर्यादी भारतीसिंह यांनी सांगितले की, माझा पतीसोबत झगडा झाला.

सर तपास संपला.

**सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलट तपासात विचारण्याजोगे प्रश्न विचारण्यास परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली. उलट तपास - सरकार तर्फे**

२. आता मला माझ्या बयानातील अधोरेखीत भाग अ वाचून दाखविण्यात आला. त्याप्रमाणे मी पोलिसांना बयान दिला होता ते बरोबर आहे. ही बाब मला सरतपासावेळी आठवत नव्हती.

**<u>उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री नागोशे यांचे मार्फत</u>**

२.		हे म्हणणे खरे आहे की, घटना माझ्या समक्ष घडलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी फिर्यादी व आरोपीचे भांडण कधीही पाहिले नाही. मी पोलिसांना बयान देताना "पती पत्नीचे भांडण झाले आहे असे मला फिर्यादीने सांगितले होते'' ही बाब मी सांगितली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक - ०७.०३.२०२६

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.